# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.01.2026** **वारःबुधवार**

---

1. जम्मू काश्मीरसंदर्भात चीन आणि पाकिस्तान यांच्यादरम्यानचा 1963 चा करार बेकायदेशीर–भारतीय लष्करप्रमुखांचं ठाम मत
2. पंतप्रधान आणि फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांचे सल्लागार बोन्ने यांच्यादरम्यान दूरध्वनीवरून चर्चा
3. दिल्लीत आज 28 व्या राष्ट्रकुल देशांच्या सभापती, पीठासीन अधिकाऱ्यांची परिषद
4. महाराष्ट्रात महापालिका प्रचाराचे सूप वाजलं, उद्या मतदान, परवा मतमोजणी
5. देशभरात आज सूर्याच्या उत्तरायणाचा सण आणि
6. महिला प्रिमिअर लीगमध्ये मुंबई इंडियन्स संघाचा विजय तर, भारत-न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांच्या मालिकेतील आज दुसरा सामना

**लष्करप्रमुख**

जम्मू आणि काश्मीरमधल्या शक्सगाम खोऱ्याबाबत चीन आणि पाकिस्तान यांच्यातील 1963 चा करार बेकायदेशीर आहे, असं ठाम मत लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी व्यक्त केलं आहे. शक्सगाम खोऱ्यातल्या कोणत्याही कारवायांना भारत मान्यता देत नाही, असंही द्विवेदी यांनी सांगितलं. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. चीनसोबतच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील परिस्थिती स्थिर आहे, मात्र त्यावर सातत्यानं लक्ष ठेवण्याची गरज आहे, असंही ते म्हणाले. तर 'ऑपरेशन सिंदूर'बद्दल बोलताना जनरल द्विवेदी म्हणाले की, ही मोहिम तिन्ही सेवांमधील समन्वयाचं सर्वोत्तम उदाहरण असून ही मोहीम अजूनही सुरू आहे आणि शत्रूच्या कोणत्याही गैरकृत्याला प्रभावीपणे सामोरं जाईल.

**पंतप्रधान-फ्रान्स**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्ष इम्यॅन्युएल मॅक्रॉन यांचे राजनैतिक सल्लागार इम्यॅन्युएल बोन्ने यांच्यामध्ये काल दूरध्वनीवरून चर्चा झाली. त्यानंतर समाज माध्यमांवरून दिलेल्या संदेशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, भारत-फ्रान्सदरम्यान विविध क्षेत्रांमध्ये बळकट आणि विश्वासार्ह धोरणात्मक भागीदारी असल्याचा पुनरुच्चार केला आहे. दोन्ही देशांदरम्यान, नवोन्मेष वर्षानिमित्त नवोन्मेष, तंत्रज्ञान आणि शिक्षण या क्षेत्रांत सहकार्याला प्रोत्साहन मिळत असल्याचं मोदींनी नमूद केलं आहे. या चर्चेत महत्त्वाच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही दृष्टीकोनांची देवाणघेवाण झाल्याचंही संदेशात नमूद केले आहे.

**जयशंकर-रुबिओ**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबिओ यांच्या दरम्यान दूरध्वनीवरून काल व्यापार, अत्यावश्यक खनिजे, अणुउर्जा आणि संरक्षण या क्षेत्रांमधील सहकार्यावर केंद्रित चर्चा झाली. अमेरिकेचे सर्जिओ गोर यांची नुकतीच अमेरिकेचे राजदूत म्हणून नियुक्ती झाल्यानंतर दोन्ही देशांदरम्यान व्यापारविषयक चर्चा होईल असे म्हटले होते. त्या पार्श्वभुमीवर, जयशंकर-रूबिओ यांच्यातील संवाद झाला. उभय नेत्यांनी परस्पर संपर्क राखण्यास सहमती दर्शवली. समाजमाध्यमांवरून दिलेल्या संदेशात, जयशंकर यांनी सकारात्मक चर्चा झाल्याचे नमूद केले आहे.

**संरक्षण माजी सैनिक**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज दिल्लीत होणाऱ्या 10व्या सशस्त्र सेना माजी सैनिक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहाणार आहे. भारताचे पहिले कमांडर-इन-चीफ, फील्ड मार्शल के. एम. करिअप्पा यांच्या कार्याचा आणि सेवेचा सन्मान करण्याच्या हेतूने दर 14 जानेवारीला हा दिवस साजरा केला जातो. 14 जानेवारी 1953ला फील्ड मार्शल के. एम. करिअप्पा सेवानिवृत्त झाले होते.

**बिर्ला-अध्यक्षसभा**

दिल्लीत आज 28व्या राष्ट्रकुल देशांच्या संसदेचे सभापती आणि पीठासीन अधिकाऱ्यांच्या परिषदेला सुरुवात होत आहे. तीन दिवसांच्या या परिषदेमध्ये 60 राष्ट्रकुल देश आणि अर्ध स्वायत्त संसद यांचे सभापती आणि पीठासीन अधिकारी सहभागी होणार आहेत. या परिषदेचा उद्देश, संसदीय लोकशाहीच्या विविध स्वरुपांविषयीचे ज्ञान आणि समज वृद्धिंगत करणे तसेच संसदीय संस्थांचा विकास करणे असा आहे. भारताचे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला परिषदेच्या अध्यक्षस्थानी असतील.

**ओम बिर्ला**

दरम्यान, काल लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी दक्षिण अफ्रिका आणि ग्रेनाडा या देशांच्या शिष्टमंडळाची दिल्लीत भेट घेतली. राष्ट्रकुल सभापती आणि पीठासीन अधिकाऱ्यांच्या सभेत शिष्टमंडळ सहभागी होणार आहे. बिर्ला यांच्यासमवेत त्यांनी लोहरी सणांचा आनंद घेत, अग्निपूजेची परंपराही साजरी केली. भारतीय सण आणि सांस्कृतिक संवाद जागतिक बंधुभाव, परस्पर आदर आणि मानवी मूल्यांना बळकटी देतात असं प्रतिपादन बिर्ला यांनी केलं. या शिष्टमंडळाचे नेतृत्व या शिष्टमंडळाचे नेतृत्व दक्षिण आफ्रिकेच्या संसदेच्या नॅशनल कौन्सिल ऑफ प्रोव्हिन्सेसच्या उपसभापती एल. गोवेंदर, उपसभापती डॉ. ॲनेली लॉट्रिएट आणि ग्रेनाडाच्या सिनेटच्या अध्यक्षा डॉ. डेसिमा विल्यम्स यांनी केले.

**राज्य निवडणूक**

महाराष्ट्रातल्या 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठीचा प्रचार काल संपला. अखेरच्या दिवशी सर्वच प्रमुख पक्षांच्या नेत्यांनी आणि उमेदवारांनी प्रचार सभा, रोड शो, समाजमाध्यम या मार्फत मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर आणि पुण्यात प्रचार सभा घेतली आणि प्रचार फेरीमध्ये सहभागी झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील मुंबईतल्या विविध प्रभागांमध्ये महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारामध्ये सहभागी होऊन स्थानिक मतदारांशी संवाद साधला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यात रोड शो घेत प्रचार केला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबईत कार्यकर्त्यांशी संवाद साधला तर मनसे अध्यक्ष राज ठाकरे काल प्रचारासाठी पुण्यात आले होते. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देखील काल शेवटच्या दिवशी चंद्रपुरात प्रचार केला. या सर्व ठिकाणी उद्या मतदान तर परवा मतमोजणी होणार आहे.

**गृहमंत्री**

देशातल्या तरुणांनी शैक्षणिक पदव्यांच्या पलीकडं लक्ष केंद्रित करत 2047पर्यंत 'विकसित भारत'घडवण्याच्या ध्येयासाठी स्वतःला समर्पित करावं, असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं आहे.ते काल गुजरातमधल्या आनंद इथल्या चारुसत विद्यापीठाच्या 15 व्या दीक्षांत समारंभात बोलत होते. पदवीधर अभियंत्यांनी राष्ट्रीय सार्वभौमत्व सक्षम करण्यासाठी महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये संशोधन करण्याचं आवाहनही गृहमंत्री शाह यांनी केलं.

**NITSER प्रधान**

राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, विज्ञान शिक्षण आणि संशोधन परिषदेच्या म्हणजे एनआयटीएसईआरची 13 वी बैठक शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत काल पार पडली. यावेळी राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था आणि भारतीय अभियांत्रिकी विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्था यांची शैक्षणिक आणि संशोधन मानके उंचावणे, प्रशासकीय क्षमता वृद्धिंगत करणे तसेच नवे उपक्रम तसेच उद्योजकतेला चालना देणे याविषयाच्या सादरीकरणांचा आढावा घेतला. नव्या शतकातील आणि रोजगारांच्या गरजांवर आधारित अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी उद्योगातील नेतृत्वाखाली अभ्यासक्रम समिती स्थापन करावी असेही प्रधान यांनी सुचवलं.

**सक्रांत, लोहरी, केरळ**

सूर्याचं उत्तरायण आणि शेतात कापणीला आलेल्या पिकांच्या आनंदाप्रित्यर्थ देशभरात उत्सव आज साजरा होत जात आहे. महाराष्ट्रात कालच्या भोगीनंतर आज मकरसंक्रांत सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. गुजरातमध्येही उत्तरायणाच्या निमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा अहमदाबादच्या जगन्नाथ मंदिराला भेट देऊन आशीर्वाद घेणार आहेत. राज्यात विविध ठिकाणी पतंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आलं असून, जगभरातील पंतगप्रेमी राज्यात दाखल होत आहेत. केरळमध्ये सबरीमला डोंगरावर मकर विलाक्कू साजरी होईल, भाविकांना पोन्नामबलामेडू इथल्या मकरज्योतीचे दर्शन घेता येईल तसेच भगवान अय्यप्पांचा पवित्र दागिन्यांची मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्याशिवाय तामिळनाडूमध्ये पोंगल, आसामध्ये भोगाली बिहू तर पश्चिम बंगालमध्ये पौष संक्रांती साजरी होईल.

**मुस्लिम ब्रदरहुड**

अमेरिकेनं मुस्लिम ब्रदरहुडच्या मध्य पूर्वेकडील तीन शाखांना दहशतवादी संघटना म्हणून घोषित केलं असूंन त्यांच्यावर आणि त्यांच्या सदस्यांवर निर्बंध लादले आहेत. ट्रेझरी आणि परराष्ट्र विभागांनी काल रात्री मुस्लिम ब्रदरहुडच्या लेबनीज, जॉर्डनियन आणि इजिप्शियन या तीन शाखांविरुद्ध या कारवाईची काल घोषणा करत त्या अमेरिकेसाठी धोकादायक असल्याचं अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी म्हटलं आहे.

**गिगधोरण**

घरपोच वस्तूची सेवा देणाऱ्या बहुतांश कंपन्या 10 मिनिटात वस्तू घरपोच देण्याची सुविधा लवकरच बंद करणार आहेत. वस्तू घरपोच पोहोचवणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेसाठी तसंच त्यांना कामासाठी पोषक वातावरण देण्याच्या दृष्टीनं हा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींची सरकारनं बैठक घेतली होती. यामध्ये जलद वस्तू पोहोचवण्याच्या संदर्भात काळजी व्यक्त करण्यात आली होती.

**भटके कुत्रे**

भटक्या कुत्र्यांना खाद्य देणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. भटक्या प्राण्यांसंदर्भातील नियमांची अंमलबजावणी होत नसल्याबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. गेल्यापाच वर्षांपासून नियमांच्या अंमलबजावणी बाबत काहीही होत नसून श्वान दंशाच्या पिडीतांना आणि त्यामुळे मृत्यू झालेल्यांच्या वारसांना राज्यांनी भरपाई द्यावी असंही सांगितलं जाईल असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. सार्वजनिक ठिकाणी भटक्या कुत्र्यांना खायला घालणा-या लोकांना आणि संघटनांच्या वर्तनावर सर्वोच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे.

**महिला प्रिमियर**

महिला क्रिकेटमध्ये काल नवी मुंबई प्रिमियर लीगअंतर्गत डी. वाय. पाटील मैदानात झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघाने गुजरात जायंट संघाचा सात गडी राखून पराभव केला. गुजरातनं मुंबई इंडियन्ससमोर 193 धावांचं लक्ष्य ठेवलं होतं.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील मर्यादित षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना आज राजकोटमध्ये खेळला जाणार आहे. सामना दुपारी दोन वाजता सुरू होईल. मालिकेतील पहिला सामना जिंकून भारत 1-0 नं आघाडीवर आहे. आजचा सामना जिंकून ही मालिका जिंकण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.